## तुझा नि माझा एकपणा

तुझा नि माझा एकपणा
कसा कळावा शब्दांना
तुझा नि माझा एकपणा

दोन आपुल्या भिन्न आकृती
अंतरात पण एकच प्रीती
काव्य कळे ते नयनांना
तुझा नि माझा एकपणा

जसा फुलातून गंध दरवळे
तसा मनातून स्नेह झुळझुळे
मिळे चेतना कणाकणा
तुझा नि माझा एकपणा

चंद्र उगवता कमळे फुलती
प्रीत उमलता हृदये जुळती
ज्याच्या त्याला कळती खुणा
तुझा नि माझा एकपणा .